CMYK

बीड । बुधवार
१५.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २७९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१

# 'आका'वर मोका, १० मिनिटांत परळीत राडा

## बसवर दगडफेक, रस्ते बंद, राजकीय नेत्यांच्या पुतळ्यांचं दहन

बीड, (प्रतिनिधी) :- अवादा कंपनी खंडणी प्रकरणामध्ये वाल्मिक कराड याच्यावर मकोका दाखल झाला आहे. धनंजय देशमुख यांच्या कुटुंबाने सोमवारी आंदोलन केले होते. वाल्मिक कराडवर मकोका दाखल करण्यात यावा अशी मागणी त्यांनी केली होती. आज वाल्मिक कराडला सुनावणीनंतर १४ दिवसांची पोलीस कोठडी आणि मकोका दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे परळीमधील वातावरण चांगलंच तापलं आहे. कराडचे समर्थक रस्त्यावर उतरले असून त्यांनी परळीमध्ये बंद पुकारला आहे. मात्र आता बीडमधील वातावरण आणखीनच चिघळत चाललं असल्याचं दिसत आहे. परळी शहर कडकडीत ▶▶पान २ वर



### आज कोर्टात हजर करणार


वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई केल्यानंतर आता त्याचा ताबा घेण्याची परवानगी कोर्टानं एसआयटीला दिली आहे. त्याला आज केज कोर्टात हजर केलं जाणार आहे. कोर्ट या प्रकरणात काय निर्णय देणार? हे पाहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### धनंजय देशमुख यांनी समाधान व्यक्त केले

संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनीही मकोका दाखल झाल्यानंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, माझ्या भावाच्या हत्येमधील जे जे आरोपी आहेत,त्या सर्वांना शिक्षा झाली पाहीजे. या गुन्ह्यात जे-जे आरोपी आहेत, त्यांच्यावर ३०२ आणि मकोकाचा गुन्हा दाखल व्हावा.मुख्यमंत्री आणि एसआयटी योग्य दिशेने काम करत असून त्यावर आमचे समाधान आहे.

### कराडची प्रकृती खालावली

अखेर वाल्मिक कराडवर देखील मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे वाल्मिक कराडच्या अडचणी वाढल्या आहेत. वाल्मिक कराडची सीआयडी कोठडी संपल्यामुळे त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. न्यायालयानं त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली मात्र त्याच दरम्यान त्याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. वाल्मिक कराडला मकोका लागताच त्याचा ताबा घेण्यासाठी एसआयटीनं न्यायालयात धाव घेतली. ▶▶पान २ वर



# 'रावणाचं टिकलं नाही, धनंजय मुंडे तू कोण?'

छ.संभाजीनगर, (वृत्तसेवा):संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. वाल्मिक कराड याच्यावर ही कारवाई झाल्यानंतर मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक केलं आहे. मुख्यमंत्री फडणवीसांचं कौतुक करताना मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्यावर मात्र निशाणा साधला आहे. 'मकोका आणि हत्येचा गुन्हा दाखल होणं अपेक्षित होतं, गरजेचं होतं. खूप आक्रोश होता, शेवटी जनभावना महत्त्वाची. राज्यातली जनता मुख्यमंत्री फडणवीसांकडे न्याय मागत होती. खंडणी आणि खुनातले आरोपी एकच आहेत. यांची आणखी एक टोळी आहे, यांच्या वेगवेगळ्या टीम आहेत. खंडणी, खून करणारी दुसरी टीम आहे. छेडछाडी करायच्या, बलात्कार करायचा, दरोडे टाकायचे, अशी एक टीम आहे. घर, जागा जमिनी बळकवायची अशी टीम आहे. या टीमना सांभाळणारा एक आहे', असं जरांगे म्हणाले आहेत. 'संघटित गुन्हेगारी करणारी धनंजय मुंडेची ही टोळी आहे. हिचा सफाया करणं मुख्यमंत्री साहेबांना गरजेचं आहे, तुम्ही मागे हटू नका. तो सरकार चालवत नाही, याचा नायनाट मुळासकट बिमोड करा. या आरोपींना पोसणाऱ्या टीमना सहआरोपी करा. यांना जन्मठेप-फाशीच झाली पाहिजे. ▶▶पान २ वर

### फडणवीसांचं कौतुक करत जरांगे बरंच बोलले!



# वाल्मिक कराडवर मकोका, धनंजय मुंडे अजित पवार यांच्या भेटीला, पडद्यामागे काय घडतंय?

मुंबई, (वृत्तसेवा):-बीड सरपंच हत्या प्रकरणात आरोपी वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड याला आरोपी करण्यात आलं आहे. त्यामुळे वाल्मिक कराडच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. वाल्मिक कराड याच्या पोलीस कोठडीसाठी उद्या कोर्टात युक्तिवाद होणार आहे. यावेळी सीआयडी आणि एसआयटीची बाजू मांडणारे वकील वाल्मिक ▶▶पान २ वर



# सरपंच संतोष देशमुखांवर झालेल्या टॉर्चरप्रकरणी सुद्धा गुन्हा दाखल व्हावा

### खासदार सोनवणे यांची मागणी

बीड, (प्रतिनिधी): - सर्व दोषी पकडले गेले पाहिजेत. मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिलेच आहेत की आम्ही कोणालाही सोडणार नाही. तसेच आदेश तपास यंत्रणेला देण्यात आले आहेत. त्यामुळे पोलिस यातील सर्वच आरोपींचे कॉल डीटेल काढून कारवाई करतील, असे खासदार बजरंग सोनवणे म्हणाले आहेत. त्यात आता वाल्मीक कराडच्या कुटुंबीयांनी तसेच समर्थकांनी आंदोलन सुरू केले आहे. कराडच्या आईने देखील यात सहभाग घेतला आहे. यावर खासदार बजरंग सोनवणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. परळीमध्ये कराड समर्थक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. यामुळे बीड जिल्ह्यात तणावाचे वातावरण निर्माण होणार का, असा प्रश्न निर्माण झाला असून यावर खासदार बजरंग सोनवणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, तणाव वगैरे काही नाही. लोकशाही पध्दतीने प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. तणाव काय असणार आहे, याआधी पण बरेच गुन्हे असे झाले आहेत, अनेक जण जेलमध्ये जाऊन आले आहेत. त्यामुळे तणाव वगैरे काही नाही. पोलिसांना सर्वांनी सहकार्य केले पाहिजे. आम्ही देखील जे पोलिस एकतर्फा वागत आहेत त्यांच्यावरच आम्ही बोलतो. पुढे बोलताना बजरंग सोनवणे, तपास हा विषय तपासाच्या दिशेने झाला पाहिजे. संतोष देशमुख यांना न्याय मिळाला पाहिजे त्यांच्या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे. संतोष देशमुख यांची ज्या पद्धतीने क्रूर हत्या झाली त्यात आम्हाला न्याय पाहिजे. त्यांच्यावर जे टॉर्चर करण्यात आले त्याचा सुद्धा गुन्हा दाखल झाला पाहिजे असे मी म्हणले. यात आता आणखी बरेच जणांवर गुन्हा दाखल होत आहे. यात जेवढे कोणी असतील त्या सर्वांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे. कोणत्या हॉटेलवर राहिले, कुठे कुठे गेले, या बऱ्याच गोष्टी तपासायच्या आहेत. पोलिस तपास करत आहेत. एसआयटीचा जो तपास सुरू आहे त्यात जेव्हा सगळे आरोपी यात येतील तेव्हा यावर बोलले पाहिजे. आज यांचा तपास सुरू असताना आपण त्यावर समाधानी बोलण्यापेक्षा तपास पूर्ण झाल्यानंतर यावर बोलणे योग्य आहे. वाल्मीक कराडच्या आईवर बोलणे योग्य नाही. प्रत्येकाच्या आईच ▶▶पान २ वर



# एसटी कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात २५ खाटांचे रुग्णालय

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांची घोषणा

मुंबई, (वृत्तसेवा):- ओला , उबेर, रॅपिडो सारख्या खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या पुरवठादारांना एकाच नियमावलीअंतर्गत आणणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. प्रवासी सुरक्षा, कार पुलींग, लायसन्स, ट्रॅफिक समस्या यासंदर्भातील पारदर्शक तक्रार यंत्रणा तातडीने तयार करण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले. राज्यातील खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या पुरवठादारांना एकाच शासकीय नियमनात आणण्यासंदर्भात आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिवहनचे अपर मुख्य सचिव, संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह प्रवासी वाहतुक पुरवठादार कंपनीचे प्रतिनिधी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. दरम्यान, याच बैठकीत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एसटीच्या जागेवर २५ तर बोरिवलीत एसटी कर्मचाऱ्यांसाठी १०० खाटांचे रूग्णालय उभारणार आहे. मंत्री सरनाईक म्हणाले की, खाजगी प्रवासी वाहतूक पुरवठादार कंपन्यांसंदर्भात केंद्र सरकारने आणलेल्या धोरणाचा विचार करून, या कंपन्याना एकाच परिवहन नियमा अंतर्गत एकत्रित आणणे गरजेचे आहे. प्रवासी सुरक्षेला प्राधान्य देण्यात यावे. सर्व प्रवासी वाहतूक पुरवठादार कंपन्यांअतर्गत चारचाकी, बाईक, टॅक्सी यांचा समावेश करण्यात येणार आहे. बाईक चालविण्यासाठी महिला चालकांनाही प्राधान्य देण्यात यावे, जास्तीत जास्त रोजगार कसा निर्माण करता येईल यासाठी प्राधान्य द्यावे. तसेच त्यांच्या सुरक्षेसंदर्भात कंपन्यांनी उपाययोजना कराव्यात अशाही सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या. खासगी वाहतूक व्यवस्था, सुस्थितीत असलेली वाहने, ▶▶पान २ वर




# प्रामाणिकपणे काम करणाऱ्या माणसाची समाज दखल घेतो-ह.भ.प.राधाताई सानप महाराज

## मातृभूमीच्या आदर्श शिक्षक विविध क्षेत्रातील गुणवंत पुरस्काराचे थाटात वितरण

बीड, (प्रतिनिधी):- समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःसाठी कुटुंबासाठी जगता जगता समाजासाठी जगले पाहिजे, समाज हितासाठी काम केले पाहिजे. समाज हितासाठी काम करणार्या व्यक्तींची समाज नेहमीच दखल घेतो. शिवाय सन्मान हा कोणाला मागून मिळत नसतो. तर त्या सन्मानासाठी लायक बनावे लागते, तसे कर्तृत्व सिद्ध करावे लागते. मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने आदर्श पुरस्कार दिलेल्या सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी त्याचबरोबर इतर क्षेत्रातील नामांकित व्यक्तींनी आपले कार्य सिद्ध केल्याने पुरस्कारासाठी ते पात्र ठरले आहेत. मातृभूमी प्रतिष्ठानची ही शाब्बासकीची थाप तुम्हाला कार्य करण्यास नक्कीच प्रेरण व स्फूर्ती देईल. ज्या क्षेत्रात तुम्ही काम करत आहात त्या क्षेत्राला अजून उंचीवर घेऊन जावे असे मत सुप्रसिद्ध कीर्तनकार राधाताई सानप महाराज यांनी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व विविध क्षेत्रातील गुणवंत पुरस्कार वितरण सोहळ्याचे उद्घाटन नंतर उपस्थिती त्यांना मार्गदर्शन करताना केले. या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मोहन महाराज खरमाटे होते. तर व्यासपीठावर माजी आमदार उषाताई दराडे, सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, रामदास हंगे, इंजि. उत्तम मिसाळ, प्राचार्य डी.जी.तांदळे, प्रा. किशोर काळे, अकोला जिल्हा शल्यचिकीत्सक श्रीमती डॉ.तारा वारे, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, प्रा. दिनकर थोरात, मोहन शिरसाट, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, वासुदेव मिसाळ, पांडुरंग जायभाये, संपादक वैभव स्वामी, संपादक संजय हांगे, उपसंपादक आत्माराम वाव्हळ, प्रा.बाळासाहेब नागरगोजे, बाजीराव ढाकणे आदी उपस्थित होते. बीड शहरातील मातृभूमी प्रतिष्ठान ▶▶पान २ वर



# एसआयटी प्रमुख बसवराज तेली हे आष्टीचे जावई

### वाल्मिक कराडच्या पत्नीने सांगितलं सुरेश धस कनेक्शन

बीड, (प्रतिनिधी):- संतोष देशमुख यांची हत्येच्या तपासासाठी १ जानेवारीला नेमलेली एसआयटी रद्द करण्यात आली आहे. त्याऐवजी ७ जणांची नवीन एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. पोलीस उपमहानिरीक्षक बसवराज तेलीच हे नवीन एसआयटीचे प्रमुख आहेत. ▶▶पान २ वर




CMYK

# दबंग दयावान?



आपल्याकडे राजकीय तसेच अन्य सर्वच धनिकांस दोन धर्मस्थळांचा मोह आवरता आवरत नाही. एक तिरुपती येथील बालाजी आणि दुसरे शिर्डी येथील साईबाबा. अनेक उद्योजक तर या देवस्थानांस आपले व्यवसाय भागीदार बनवतात आणि नफा झाल्यास त्याचा काही वाटा त्या देवस्थानाच्या हुंडीत घातला जाईल असे नमूद करतात. अर्थात हे असले उद्योजक कोण असतात हे सांगण्याची गरज नाही आणि त्याची चर्चा करण्याचे प्रयोजन नाही. तथापि या 'असल्या' उद्योजकांप्रमाणे राजकीय पक्षही देवदेवतांस आपले भागीदार बनवतात किंवा काय याचा शोध घ्यायला हवा. ही बाब शिर्डीस विशेष लागू होते. कारण अलीकडे अनेक राजकीय पक्षांस शिर्डी या नवतीर्थस्थानाचा मोह पडू लागला असून महाराष्ट्रातील बहुतांश राजकीय पक्षांची अधिवेशने तेथे भरताना दिसतात. कदाचित बहुतेक राजकीय पक्षांतील धनाढ्य नेते शिर्डी आणि परिसरांतून येतात हेही कारण त्यामागे नसेल असे नाही. पूजा असो वा पक्षाचे अधिवेशन. सढळ हस्ते खर्च करू शकणारा यजमान महत्त्वाचा! असे श्रीमंत यजमान शिर्डी आणि आसपासच्या दुष्काळी प्रदेशात मुबलक. असो. भाजपचे 'महाविजयी अधिवेशन' रविवारी शिर्डी या तीर्थस्थळी पार पडले. पंचायत ते पार्लमेंट भाजपचा(च) अंमल असायला हवा, असे त्या पक्षाचे चाणक्य, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या अधिवेशनात भाजपच्या कार्यकर्त्यांस बजावले. 'श्रद्धा आणि सबुरी'चे धडे देणारी संघाची दीक्षा आणि श्री साईंचे आशीर्वाद यामुळे शहा यांचे शब्द खरे ठरतील यात शंका नाही. त्यामुळे भाजपच्या भवितव्याची चिंता नाही. काळजी आहे ती भाजपच्या मित्रपक्षांची. तथापि ती करण्याआधी सहयोगी, विरोधी पक्षानेच नव्हे तर एकंदर सर्वच राजकीय पक्षांनी भाजपकडून बरेच काही शिकायला हवे. काही महत्त्वाच्या निवडणुकांआधी महासंकल्प मेळावे, निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले की महाविजयी मेळावे, तितके यश न मिळाल्यास महाचिंतन मेळावे इत्यादींचे आयोजन कसे करावे याचे धडे अन्य राजकीय पक्षांनी भाजपकडून जरूर घ्यावेत. हे असे करणे महा-महत्त्वाचे. याचे कारण यातून स्वत:च स्वत:स वा स्वत:च्या प्रत्येक कृतीस 'महा' ठरवण्याची अंगभूत सवय लागते आणि ती जनुकीय रचनेत जाऊन बसते. असे झाले की सगळेच 'महा' ठरते. आणि या अशा अधिवेशनांमुळे कार्यकर्ते, हौशे, गवशे आणि नवशेही व्यग्र राहतात. तसेच पक्षाच्या अर्थव्यवस्थेस चालना मिळते. निवडणूक रोख्यांतील रोख बाहेर काढण्याचा हा राजमार्ग. अर्थात तो भाजपस जितका उपलब्ध आहे तितका अन्य पक्षांस नाही, हे मान्य. पण भाजपचे हे अनुकरण त्यांनी सुरू केल्यास त्यांचाही निवडणूक रोखे मार्ग अधिक प्रशस्त आणि रुंद होऊ शकेल. असो. विषय भाजप सहयोगींच्या भवितव्याचा. तो गांभीर्याने घ्यायला हवा कारण पंचायत ते पार्लमेंट सर्वच काही भाजप स्वबळावर करू लागला तर अर्ध्या शिवसेनेचे, अर्ध्या राष्ट्रवादीचे भविष्य काय? आधीच स्वबळावर पूर्ण सत्ता नसतानाही भाजपने या अर्ध्या शिवसेनेस आणि अर्ध्या राष्ट्रवादीस महाराष्ट्रात चांगलेच चेपून टाकलेले आहे. एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांना एकेक खात्यासाठी किती घाम गाळावा लागला हे त्यांच्या ओल्या झालेल्या हातरुमालांच्या संख्येवरून लक्षात येईल. इतके करूनही शिंदे यांस गृह नाही ते नाही मिळाले आणि अजित पवारांच्या अर्ध्या राष्ट्रवादीस केंद्रीय मंत्रिमंडळापासून दूर ठेवले गेले. म्हणजे जे काही मिळाले आहे त्यातून पुढील जेमतेम चार वर्षांचीच बेगमी होणार! कारण २०२९ च्या निवडणुकांत स्वबळावर सत्ता आणली जाईल याची घोषणा खुद्द शहा यांनी केलेली आहेच. शहा यांचा शब्द! निवडणूक आयोगादी यंत्रणा तो कसा काय खाली पडू देतील? त्यामुळे भाजपची स्वबळावर सत्ता येईलच येईल. मग त्या वेळी अर्धी शिवसेना आणि अर्धी राष्ट्रवादी काय करणार? की त्या वेळी फक्त हे राज्यमंत्रीपदावरच समाधान मानणार? मानतीलही! कारण मंत्रीपदे ही या पक्षांतील अनेकांसाठी बोनसच जणू. या सर्वांस खरा आनंद आहे तो केंद्रीय तपास यंत्रणांचे जू मानेवरून उतरले याचा. ईडी-पीडा नसेल तर मंत्रीपद नाही मिळाले तरी बेहत्तर असे त्यांतील अनेकांस वाटत नसेलच असे नाही. आधी 'खाल्लेले' पचवून घेतले जात असेल, चांगल्या तऱ्हेने अंगाशी लागणार असेल तर नव्याने (काही काळ) चार घास मिळाले नाहीत तरी हरकत नाही, असे कोणाकोणास वाटू शकते. त्यामुळे भाजप स्वबळाचे नारे देत असताना, ते प्रत्यक्षात आणत असताना त्या पक्षाच्या विजय यात्रेत आताचे आघाडी घटक पक्ष अक्षता टाकण्यात आनंद मानू शकतात. या घटक पक्षांची ही मानसिकता ठाऊक असल्याने भाजपने तरी त्यांची फिकीर का करावी? ती तो कशी करत नाही, हेच शिर्डी अधिवेशनात दिसून आले. तेव्हा भाजपचे आगामी काळातील मार्गक्रमण 'यायचे तर या' अशा आविर्भावात असेल याची दखल आघाडी पक्षांनी घेतली असावी. नपेक्षा संदर्भासाठी त्यांनी गोव्यातील महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, पंजाबातील अकाली दल, आसाम गण परिषद इत्यादी पक्षांची आजची अवस्था काय याचे अवलोकन करावे. हे सर्व एके काळी भाजपचे सहयोगी होते, ही बाब त्या पक्षाच्या आजच्या सहयोगींच्या ध्यानात यावी. ''इतके समर्थ व्हा की दगाबाजी करण्याची कोणाची हिंमत राहणार नाही'', अशी मसलत शहा यांनी या अधिवेशनात स्वपक्षीयांस दिली. हे वाचून कोणास भारत 'काँग्रेसमुक्त' करण्याच्या घोषणेचे स्मरण झाल्यास तो केवळ योगायोग समजावा. त्या वेळी शहा यांची राजकारण काँग्रेसमुक्त करण्याची इच्छा बऱ्याच अंशी पूर्ण झाली. कारण बरेचसे शहाणे काँग्रेसजन भविष्याची चाहूल लागल्याने स्वत:च भाजपवासी झाले. आज भाजपच्या सर्वांत कार्यक्षम मंत्रीगणांत प्राधान्याने माजी काँग्रेसजन सर्वाधिक आहेत, ही बाब लक्षात घेतल्यास राजकारण 'काँग्रेसमुक्त' करणे या घोषणेचा खरा अर्थ मूढमतींस कळू शकेल. त्याच धर्तीवर दगाबाजांचा नायनाट करण्याच्या घोषणेचे होऊ शकेल. शहा यांच्यामुळे भाजपचा दराराच इतका वाढेल की सर्व माजी/आजी आणि भावी दगाबाज आपापल्या खतावण्या घेऊन भाजपच्याच दारी येतील आणि 'सबका साथ सबका विकास' या धोरणाने चालणारा भाजप त्या सर्वांस आपल्यात आनंदाने सामावून घेईल. झाला दगाबाजांचा नायनाट! म्हणजे ज्याप्रमाणे राजकारण काही काळ का असेना काँग्रेसमुक्त झाले त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे राजकारण दगाबाजमुक्त होईल. आता काही काळाने ज्या प्रमाणात काँग्रेस पुनर्जीवित होईल त्या प्रमाणात दगाबाजही फिनिक्स पक्ष्याप्रमाणे झेपावतील, हे खरे. पण त्या वेळी पुन्हा एकदा आतासारखी त्यांना सामावून घेण्याची मोहीम घेता घेण्याची सोय असेल आणि त्यासाठी केंद्रीय तपास यंत्रणा आपापली जबाबदारी उचलण्यास तत्पर असतील, हेही खरे. या अशा आणि इतक्या दुर्दम्य आशावादाने स्थानिक भाजप नेते, कार्यकर्ते यांस आत्मविश्वास देतानाच अमित शहा हे अलीकडेच 'दगाबाजां'हाती मरण पावलेल्या बीडच्या संतोष देशमुख यांच्याविषयी चार शब्द बोलले असते तर पक्ष कार्यकर्त्यांस अधिक जोम येता. कारण नाही म्हटले तरी हे मृत देशमुख भाजपचे स्थानिक बूथ-प्रमुख होते आणि त्यांच्या हत्येची दखल केंद्रीय गृहमंत्र्यांनी घेतली असती तर मृताच्या कुटुंबीयांच्या दु:खावर फुंकर घातली गेली असती. दगाबाजांच्या छातीत धडकी बसवण्याइतके दबंग होता होता दयावान होणे राहून जाऊ नये, इतकेच.

# शरद पवारांनी उडवली अमित शाह यांची खिल्ली!

## म्हणाले, ''कुठे इंद्राचा ऐरावत आणि कुठे..''



मंबई, (वृत्तसेवा):-केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दोन दिवसांपूर्वीच शरद पवारांवर जोरदार टीका केली होती. तसंच उद्धव ठाकरेंवरही त्यांनी टीका केली होती. शरद पवार यांनी दगा-फटक्याचं राजकारण केलं. उद्धव ठाकरेंनीही दगा फटका केला. पण महाराष्ट्राच्या जनतेने त्यांना धडा शिकवला या आशयाचं वक्तव्य अमित शाह यांनी केलं होतं. त्यांच्या टीकेचा शरद पवारांनी शेलक्या शब्दांत समाचार घेतला. कुठे इंद्राचा ऐरावत आणि कुठे शामभट्टाची तट्टाणी ही म्हणही त्यांनी वापरली. ''महाराष्ट्राच्या विजयाचे अनेक अर्थ आहेत. महाराष्ट्राच्या विजयाने १९७८ पासून शरद पवारांनी जे दगा फटक्याचं जे राजकारण होतं ते २० फूट गाडण्याचं काम केलं. उद्धव ठाकरेंनी आपल्याशी जो द्रोह केला, २०१९ ला विचारधारा सोडली आणि बाळासाहेब ठाकरेंच्या सिद्धातांशी तडजोड केली. फसवणूक करुन, लबाडी करुन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले होते. उद्धव ठाकरेंना महाराष्ट्राने त्यांची जागा दाखवली. १९७८ ते २०२४ पर्यंत महाराष्ट्रात अस्थिरतेचं राजकारण सुरु होतं. ते जनतेने संपवून दाखवलं.'' अशी टीका अमित शाह यांनी केली होती. आज शरद पवारांनी पत्रकार परिषद घेत अमित शाह यांचा उल्लेख ते गृहस्थ असा करत उत्तर दिलं. ''देशाच्या गृहमंत्र्यांनी शिर्डीत भाषण केलं. भाषण करणं हा त्यांचा अधिकार आहे. पण थोडीबहुत माहिती घेऊन भाषण केलं तर लोकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकते. १९७८ चा संदर्भ देऊन अमित शाह यांनी माझी आठवण झाली. १९७८ पासून मी राजकारणात काय केलं त्याचा उल्लेख त्यांनी भाषणात केला. त्यांना कदाचित माहीत नसेल १९७८ मध्ये म्हणजे ४० वर्षांपूर्वी अमित शाह नक्की कुठे माहीत नाही. १९७८ मी राज्याचा मुख्यमंत्री होतो. माझ्या मंत्रिमंडळात जनसंघाचे नेते उत्तमराव पाटील, दुसरे नेते हशू आडवाणी असे जनसंघाचे लोक माझ्या मंत्रिमंडळात होते. १९७८ च्या पुलोद सरकारची माहिति घेतली तर महाराष्ट्रासाठी चांगलं योगदान दिलं. मी मुख्यमंत्री असताना उत्तमराव पाटील उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री होते. हशू आडवाणी नगरविकास मंत्री होते. माझ्या मंत्रिमंडळात कर्तृत्ववान लोक माझ्या बरोबर काम करत होते'' असा टोला शरद पवार यांनी लगावला. ''अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण आडवाणी यांची नावं घेता येतील. त्यांनी कधी अतिरेकी भूमिका घेऊन राजकारण केलं नाही. भूजला भूकंप झाला तेव्हा देशातल्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलवण्यात आली होती. त्यात भूकंप, अतिवृष्टी या संकटांमध्ये काय केलं पाहिजे त्यासाठी आपात्कालीन स्थितीत काय केलं पाहिजे यावर चर्चा झाली. त्यावेळी अटलबिहारी वाजपेयींनी माझं नाव आपात्कालीन स्थितीत काय करता येईल याबाबत शरद पवारांचं मार्गदर्शन घेतलं पाहिजे असं सुचवलं होतं. अटलबिहारी वाजपेयी यांनी मी विरोधी पक्षाचा असताना मंत्र्याचा दर्जा देऊन मला ते काम सोपवलं होतं. ही पार्श्वभूमी अलिकडच्या लोकांना माहीत नसावं. मी किंवा उद्धव ठाकरे यांच्याबाबत जे उल्लेख झाले त्याबाबत एक मराठीत म्हण आहे कुठे इंद्राचा ऐरावत आणि कुठे शामभट्टाची तट्टाणी ही म्हण मला आठवते'' असं म्हणत शरद पवार यांनी अमित शाह यांची खिल्ली उडवली.



बीड : मकर संक्रांतीनिमित्त मंगळवारी महिलांनी विठ्ठलाच्या मंदिरांमध्ये एकमेकींना वान देऊन मोठ्या उत्साहात तिळगुळ घ्या, गोड गोड बोला... असे म्हणत ये तुम्ही शुभेच्छा देऊन आनंदात संक्रात साजरी करताना महिला भगिनी छायाचित्र दिसत आहेत. (छायाचित्र :आराध्या नरनाळे)

# वाल्मिक कराडवर मकोका दाखल होताच अजित पवारांची मोठी प्रतिक्रिया

मुंबई, (वृत्तसेवा):- बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सात आरोपींना अटक झाली असून त्यांच्यावर मकोका दाखल करण्यात आला होता. मात्र खंडणी प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराडवरही मकोका दाखल करण्यात यावा, अशी मागणी गेल्या काही दिवसांपासून केली जात होती. संतोष देशमुख यांचे कुटुंबियांनीही यासाठी आक्रमक पवित्रा घेतला होता. त्यानंतर आज वाल्मिक कराडवर मकोका दाखल करण्यात आला असून त्याला १४ दिवसांच्या न्यायलयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना सदर कारवाईवर समाधान व्यक्त केले. माध्यमांशी बोलताना अजित पवार म्हणाले, ''मुख्यमंत्री आणि आम्ही आधीच ठरवले होते की, या प्रकरणात हायगय न करता कुणालाही सोडायचे नाही. जे दोषी असतील, जे कुणी संबंधित असतील, ते कुणीही असले तरी त्यांच्यावर कारवाई करायची. या घटनेला महिना होऊन गेला, त्यामुळे संतोष देशमुख यांचे कुटुंबिय चिंतेत होते. पण पोलीस, न्यायालय, एसआयटी त्यांच्या पद्धतीने काम करत आहेत. संतोष देशमुख यांची अतिशय निर्घृण पद्धतीने हत्या झाली. शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात अशी घटना कुणीच खपवून घेणार नाही.

पान १ वरून

## आका वर मोका...

बंद करत शहरातील प्रमुख रस्त्यांवर टायर झाळून आंदोलन केलंय. परळी शहरांमध्ये बस वरती दगडफेक आणि प्रमुख रस्त्यांवरती टायर जाळून रस्ते बंद करण्यात आलेत. राजकीय नेते आणि समाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या पुतळ्यांचे दहन करण्यात आले आहे. यामध्ये मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील, आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या फोटोच्या प्रतिमेचे दहन करण्यात आलं. वाल्मिक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे दाखल केलेले मागे घ्या अशी समर्थकांनी मागणी केली. परळी शहरातील मुख्य रस्ते वरती टायर जाळून आंदोलन करण्यात आलेत. परळी शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले होते परळी तालुक्यातील बस सेवा देखील बंद करण्यात आलेली आहे. वाल्मिक कराड यांच्या आई पारूबाई कराड यांना आंदोलन सुरू केलं आहे. या आंदोलनादरम्यान त्यांना भोवळ आली होती. काही वेळाने त्यांची प्रकृती खालावली. डॉक्टरांनी तपासल्यावर त्यांना आंदोलन मागे घेण्याचा सल्ला दिला होता. मात्र पाणीसुद्धा घेणार नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्यांच्यासोबत काही कार्यकर्ते आहेत जे आंदोलनामध्ये सहभागी झाले आहेत. त्यांचीसुद्धा प्रकृती खालावत चालली आहे.

## कराडची प्रकृती...

न्यायालयाकडून एसआयटीला वाल्मिक कराडचा ताबा घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. आता उद्या त्याला न्यायालयात हजर केलं जाणार आहे. दरम्यान त्यापूर्वी एक मोठी बातमी समोर येत आहे. ती म्हणजे वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई केल्यानंतर त्याची वैद्यकीय चाचणी करण्यात आली. याचदरम्यान त्यांची प्रकृती बिघडल्यानं वैद्यकीय चाचणीवेळीच त्याचा ईसीजी काढण्यात आला आहे.

## रावणाचं टिकलं नाही...

या १००-१५० जणांनी राज्य वेठीस धरलं आहे. यांच्या पाठीराख्याची नार्को टेस्ट करा', अशी मागणी जरांगे पाटलांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. 'ती जात चांगली आहे, पण धनंजय मुंडेच्या गुंडाच्या टोळीने जातीची पत घालवून टाकली आहे, त्यांच्यावर खाली मान घालून चालवायची वेळ आणली. मी मुख्यमंत्री साहेबांचं कौतुक करतो, पण तपासात पुढे घोळ व्हायला नको. याच्यातला एकही आरोपी सुटता कामा नये. या टोळीला पैशासाठी जात-पात कळत नाही, यांचा माज आणि मगरुरी उतरवली पाहिजे. धनंजय मुंडेनी ही टोळी तयारी केली आहे. आरोपीला पाठिंबा देतात, सोडण्यासाठी सांगतात', अशी टीका जरांगेंनी केली आहे. 'धनंजय मुंडेला खूप मोठा भ्रम होता, मी म्हणजे अमृत पिऊन आलो आहे. राज्यात माझी लोक मगरुरी करणार, माज करणार, माझं कुणी काही करू शकत नाही. अरे रावणाचं टिकलं नाही, तू कोण आहे?', असा निशाणा मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडेंना विचारला आहे.

पान १ वरून

## एसटी कर्मचाऱ्यांसाठी...

प्रवाशांची सुरक्षा, हेल्मेट, महिला चालकांची सुरक्षा, झीरो कमीशन सेवा इत्यादी बाबींचा वाहतूक धोरणात समावेश करण्यासंदर्भातील सादरीकरण यावेळी परिवहन आयुक्त विवेक भीमनराव यांनी केले. राज्यातील अनेक बसस्थानके बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा, या तत्वावर विकसित करण्यात येत आहेत. या एस. टी.च्या प्रकल्पात प्रत्येक जिल्ह्यात २५ तर मुंबईतील बोरिवली येथील जागेवर १०० खाटांचे रूग्णालय एस. टी. कर्मचाऱ्यांसाठी सुरू करण्यात येणार आहे. या रूग्णालयात एस. टी. कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून उपचार करण्यात येतील, तसेच पाच लाखांपर्यंतच्या शस्त्रक्रियांचा खर्च राज्यशासन करेल, असेही मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. सध्या राज्यभरात विविध ठिकाणी बांधा- वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर एसटीच्या जागांचा विकास केला जात आहे. भविष्यात या रुग्णालयांमध्ये एसटी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना कॅशलेस वैद्यकीय सुविधा पुरवण्यात येतील जेणेकरून त्यांना इतर महाग खाजगी रुग्णालयात जाऊन खर्च करावा लागणार नाही. पुणे, कोल्हापूर, पूसद, वाशिम येथे रूग्णालय उभारण्यासंदर्भातील सादरीकरण यावेळी करण्यात आले.

## वाल्मिक कराडवर मकोका...

कराडला कोणत्या पुरावांच्या आधारे आरोपी केलं याची माहिती युक्तिवादादरम्यान देण्याची शक्यता आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचा रोल होता का? आणि होता तर नेमका काय रोल होता? ते आता लवकरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे. एकीकडे या सगळ्या घडामोडी सुरु असतानाच मुंबईतून आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. मुंबईत मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. मंत्री धनंजय मुंडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीसाठी त्यांच्या 'देवगिरी' निवासस्थानी दाखल झाले. वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. त्यामुळे अजित पवार आणि धनंजय मुंडे या दोन्ही नेत्यांमध्ये वाल्मिक कराड विषयी काही चर्चा होते का? ते पाहणं महत्त्वाचं आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांच्याकडून संतोष देशमुख हत्या प्रकरणाची माहिती जाणून घेतली आहे. अजित पवार यांनी आज दुपारीच या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. कुणाचीदेखील गय केली जाणार नाही. ज्याचे धागेदोरे या तपासात समोर येतील त्याच्यावर कारवाई होणार, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली आहे. दरम्यान, अजित पवारांच्या देवगिरी बंगल्यावर बैठक पार पडणार आहे. या बैठकीसाठी धनंजय मुंडे अजित पवारांच्या देवगिरी बंगल्यावर दाखल झाल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अजित पवार हे दर मंगळवारी आपल्या पक्षाच्या सर्व मंत्र्यांची आणि ज्येष्ठ नेत्यांची बैठक बोलवत असतात. अजित पवार यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी ही बैठक पार पडते. तशीच

पान १ वरून

बैठक आज देखील आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी धनंजय मुंडे देवगिरी निवासस्थानी आल्याची माहिती आहे. दरम्यान, दोन्ही नेत्यांमध्ये बीडच्या प्रकरणावर चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे. धनंजय मुंडे यांनी अजित पवारांना या प्रकरणाची माहिती दिली आहे. यानंतर आता काय-काय घडामोडी घडतात ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## सरपंच संतोष देशमुखांवर...

मन हळवे असते, त्यांच्यावर मी बोलू शकत नाही. तसेच जे लोक आंदोलन करत आहेत त्यांनी कायदा व सुव्यवस्था राखूनच आपण वागावे, असा सल्ला देखील बजरंग सोनवणे यांनी दिला आहे.

## प्रामाणिकपणे काम करणाऱ्या...

गेले १७ वर्षापासून विविध क्षेत्रात सामाजिक काम करत आहे. आतापर्यंत प्रतिष्ठानच्या वतीने दोन हजारापेक्षा जास्त सामाजिक क्षेत्रात काम करणार्या अधिकार्यांचा, सामाजिक कार्यकर्त्यांचा आणि शहरातील प्रमुख अशा विविध शाळेतील हजारो गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला आहे. शिवाय या मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने दीड हजार कुटुंबाच्या रेशीमगाठ बांधल्या आहेत. त्याचबरोबर या सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक क्षेत्रात ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यावर्षी १८ व्या वर्षात पदार्पण करत असताना मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षण व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्या शिक्षक बंधू भगिनींचा आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणार्या अधिकारी कर्मचार्यांचा आदर्श पुरस्कार राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनी म्हणजेच रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिव्य कार्यक्रमात देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. खरमाटे महाराज हे होते. तर या कार्यक्रमाचे उद्घाटन ह.भ.प.राधाताई महाराज सानप यांनी केले. यावेळी मार्गदर्शन करताना हभप राधाताई सानप महाराज यांनी मातृभूमी प्रतिष्ठानने केलेल्या कार्याचा उल्लेख करत प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांचे तोंड भरून कौतुक केले. यावेळी बोलताना राधाताई सानप महाराज म्हणाल्या की, समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःसाठी कुटुंबासाठी जगता जगता समाजासाठी जगले पाहिजे, समाज हितासाठी काम केले पाहिजे. समाज हितासाठी काम करणार्या व्यक्तींची समाज नेहमीच दखल घेतो. शिवाय सन्मान हा कोणाला मागून मिळत नसतो. तर त्या सन्मानासाठी लायक बनावे लागते, तसे कर्तृत्व सिद्ध करावे लागते. मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने आदर्श पुरस्कार दिलेल्या सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी त्याचबरोबर इतर क्षेत्रातील नामांकित व्यक्तींनी आपले कार्य सिद्ध केल्याने पुरस्कारासाठी ते पात्र ठरले आहेत. आज त्या सर्व पात्र अशा शिक्षक शिक्षकेत्तर बंधू-भगिनींचा आणि विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींचा गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान होत आहे. ही मोठी आनंदाची बाब आहे. मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने आपण केलेल्या कार्याची दखल घेऊन आपल्या पाठीवरती ही शाब्बासकीची आणि

पान १ वरून

कौतुकाची थाप तुम्हाला कार्य करण्यास नक्कीच प्रेरणा स्फूर्ती देणार आहे. ज्या क्षेत्रात तुम्ही काम करत आहात त्या क्षेत्राला तुम्हाला अजून खूप काम करुन त्या क्षेत्राला खूप उंचीवर घेऊन जावे लागणार आहे. आपल्या प्रत्येक कार्यात मातृभूमी प्रतिष्ठानच्या आणि माझ्या शुभेच्छा कायम सोबत राहणार आहेत, असे सांगत उपस्थित सर्वांनाच राधाताई सानप महाराज यांनी भरभरुन आशीर्वाद दिले. या कार्यक्रमाच्या दुसर्या सत्रात मार्गदर्शन करताना राधाताई सानप महाराज म्हणाल्या की, सद्य परिस्थितीत प्रत्येक मुलीला नोकरदार नवरा मिळणार नाही, तसा हट्ट कश्यासाठी? पैशाने माणसाची परिस्थिती सुधारते पण मन:स्थिती सुधारत नाही. पैसेवाला जोडीदार पाहण्यापेक्षा तुम्हाला समजून घेणारा आणि तुमच्या कार्यात मदत करणारा जोडीदार शोधा, तुमची मनस्थिती उत्तम राहण्यास मदत होईल. प्रत्येक आईनी मुलींना स्वयंपाक शिकवून व योग्य संस्कार देण्याची गरज असल्याचे सांगितले. त्यानंतर शिक्षण व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्या २० शिक्षक बंधु-भगिनींचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रातील २० नामांकीत व्यक्तींचा आदर्श गुणवंत अधिकारी, कर्मचारी असा पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. तसेच महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळालेल्या 'शोध निर्मूलनाचा' या नाटकातील सर्व कलावंतांचा चषक व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर बीड शहरातील संस्कार विद्यालयाचे ११, यशवंत विद्यालयाचे १२, चंपावती विद्यालयाचे ०५, भगवान विद्यालयाचे ५, गुरुनानक विद्यालयाचे ०५, प्रगती विद्यालयाच्या १० गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डी.जी. तांदळे, राजकुमार कदम, रामदास हांगे, संजय कोठारी, अकोला जिल्हा शल्यचिकीत्सक श्रीमती डॉ.तारा वारे,ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे यांची समायोचित भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ संजय तांदळे यांनी केले. तर सूत्रसंचलन आत्माराम वाव्हळकर सर आणि बाळासाहेब नागरगोजे सर यांनी केले. तर आभार बाजीराव ढाकणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हनुमान बडे, प्रा.डॉ.अशोक नागरगोजे, प्रा.डॉ.प्रकाश फड, उध्दव लाड, संतोष गर्जे, भारत ठोंबरे, डॉ.लक्ष्मण पवळ, दिलीप चिंचोलकर, शशीधर चाटे, संदीप कांबळे, रविंद्र फड, राजकुमार कुलकर्णी, बाळासाहेब खाडे, बाळासाहेब नागरगोजे यांच्यासह इतरांनी बहुमोल परिश्रम घेतले. याप्रसंगी बीड जिल्ह्यासह राज्यभरातून विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एसआयटी प्रमुख...

पण याबाबत वाल्मिक कराड यांच्या पत्नी मंजिली कराड यांनी महत्वाची माहिती दिली आहे. बसवराज तेली हे आष्टीचे जावई आहेत. ते शीतल तेली यांचे पती असून त्या आयएएस अधिकारी आहेत. म्हणजे सुरेश धस यांचे ते जवळचे असल्याचे मंजिली कराड यांनी सांगितलं आहे. त्यामुळं एसआयटी मधील आठही अधिकारी बदला अशी मागणी देखील त्यांनी केलीय.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व भूगोल दिन साजरा



**नेकनूर । प्रतिनिधी**

माऊली विद्यापीठ केज संचलित, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर येथे राष्ट्रीय सेवा योजना, भूगोल विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ' मा. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार व भूगोल दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी भूगोल विभागप्रमुख डॉ. जाधव जे. के. यांच्या हस्ते डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मत व्यक्त करताना डॉ. जाधव जे. के. म्हणाले की, आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन, भूगोल दिन व मकरसंक्रांत असा त्रिवेणी दिनविशेष आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे आपल्या देशात कृषी व्यवस्था व त्याच्याशी निगडित अनेक सण-समारंभ साजरे केले जातात. सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो त्यामुळे या दिवशी मकरसंक्रांत साजरी केली जाते. भूगोल महर्षी डॉ. सी. डी. देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिवस म्हणून साजरा केला जातो. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मराठवाडा विद्यापीठास नाव देण्यासाठी इ. स. १९७६ ते इ.स. १९९४ या दरम्यान महाराष्ट्रात घडलेले दलित बौद्ध चळवळीचे आंदोलन झाले. १९९४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार झाला.

## राष्ट्रसंत भगवानबाबांनी समानता आणि बंधुतेची शिकवण दिली : राजेभाऊ फड

### जनसंपर्क कार्यालयात पुण्यतिथीनिमित्त अभिवादन ; अनेकांची उपस्थिती

**परळी । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत भगवानबाबा यांनी समाजातील गोरगरीब, वंचित, आणि शोषित घटकांसाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारधारेचा आजच्या पिढीने आदर्श घेणे गरजेचे आहे. समाजातील समानता आणि बंधुता वाढवण्यासाठी भगवानबाबांच्या शिकवणीचे पालन करणे ही खरी त्यांना आदरांजली ठरेल. असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील जनसंपर्क कार्यालयात राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.



चारित्र्यसंपन्न राष्ट्रसंत श्री भगवानबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबा शिंदे, कन्हेरवाडी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन मिनिनाथ दादा फड, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष एच.यु.फड, शिवराज साखरे, समाधान मुंडे, महेश मुंडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. तद्नंतर राजेभाऊ फड यांनी उपस्थितांना संबोधित केले. राष्ट्रसंत भगवानबाबा यांनी एकर विका पण शिका असा शैक्षणिक दूरदृष्टीचा मूलमंत्र दिला. महाराष्ट्रात आणि देशात संत परंपरा बाबांनी अतिशय ताकदीने रुजवली त्याचबरोबर समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा आणि चालीरीती तसेच अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अखंडपणे प्रयत्न केले. बाबांनी दिलेली समानतेची आणि बंधुत्वाची शिकवण सर्वांनी आचरणात आणणे ही खरी काळाची गरज असल्याचेही फड यांनी म्हटले. अभिवादन कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर उपस्थित सर्वांना तिळगुळ देत मकर संक्रंतीनिमित्त राजेभाऊ फड यांनी शुभेच्छा दिल्या.

## अथरवण पिंपरी आश्रम शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानद जयंती उत्साहात साजरी



**बीड । प्रतिनिधी**

बीड पासून जवळच असलेल्या श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ बीड संचलित, प्राथमिक /माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा तथा दीनानाथ बालकाश्रमाच्या प्रांगणात राष्ट्रमाता, राजमाता, जिजाऊ मॉसाहेब यांची व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य खंदारे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक शिंदे सर, पर्यवेक्षक जवरे सर, ज्येष्ठ शिक्षक पैठणे सर, श्रीमती कांबळे मॅडम व श्रीमती खंदारे मॅडम या व्यासपीठावर अग्रस्थानी होत्या. याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी जिजाऊ मॉसाहेब व स्वामी विवेकानंदांविषयी आपले मनोगते व्यक्त केली. अनेकांनी गीतातून महापुरुषांबद्दलचे गुणगायन केले. याप्रसंगी व्यासपीठावरील सर्व मान्यवरांनी दोन्ही महापुरुषांबद्दल विशेष माहिती दिली. याप्रसंगी शिंदे व्ही.एन.सर यांनीही उपस्थित यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.साक्षी शिंदे व कोमल प्रभाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन दातार सर यांनी मानले. या कार्यक्रमास आश्रम शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन पवार व्ही. एन., दातार सर यांनी केले.

## वैष्णवी महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नाम विस्तार दिन साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित व साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वैष्णवी महाविद्यालया मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३१ वा नामविस्तार दिन साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शामसुंदर गुळभिले , तर प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभागाचे प्रा.डॉ. होके कैलास होते.प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणा मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर हे सहजासहजी झालेले नसून त्यासाठी अनेकांनी आपले बलिदान दिलेले आहे.आणि त्यांचे बलिदान म्हणजे आज आपल्या विद्यापीठाचा नाम विस्तार होय असे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भौतिकशास्त्र विभागाचे प्रा.दत्ता सरवदे यांनी सूत्रसंचालन वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. बाळासाहेब राजमाने यांनी केले.तर आभार इंग्रजी विभागाचे प्रा. सतीश फुन्ने यांनी मांडले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत इस्त्राईल येथे रोजगाराची संधी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने (E-C) राज्यामध्ये जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याची शिफारस केली आहे, जेणेकरून महाराष्ट्र राज्य १ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे यशस्वी वाटचाल करू शकेल. यामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासह बांधकाम, आरोग्य व इतर क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात आला आहे.

यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी, एक असलेल्या इस्त्राईल आणि भारत यांच्यातील कराराद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करणे, या अंतर्गत इस्त्राईल देशात ïïï;होम बेस्ड हेल्थ केअर गिव्हर वर्करïïï; यांना इस्त्राईलमध्ये (नॉन वॉरझोन) रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मित्र संस्थेने पुढाकार घेतला आहे.

त्या करिता पात्रता निकस पुढील प्रमाणे आहेत.

इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असावे.वय वर्षे २५ ते ४५ वयोगटाचे उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे काळजीवाहू (घरगुती सहायक) सेवांसाठी निपुण/ पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे (ओ.जे.टी. सह). भारतीय प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या मिडवायफरी मधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किंवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंटमधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए / एएनएम / जीएनएम / बीएससी नर्सिंग / पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. तरी अधिकाधिक संख्येने इच्छुक व्यक्तींनी इस्त्राईलला जाण्यासाठी https://maharashtrainternational.com/jobDetail.aspx या संकेत स्थळावर नोदणी करावी. तसेच सदर लिंक वर जाऊन नोंदणी करण्यासाठी व वारंवार अद्ययावत होणा-या माहितीकरीता इशशवड्ज्ञळश्रश्र या फेसबुस पेजला लाईक करावे व अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०२४४२-२९९११६ या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता सहायक आयुक्त बीड यांनी केले आहे.

## कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये हाडांसाठी भव्य मोफत शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

येथील कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये हाडाची ठिसुळता (ऑस्टिओपोरोसीस) मोफत तपासणी शिबीर येत्या रविवार दि १९ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत आयोजीत केले आहे त्याचा लाभ घेण्याचे आवाहन कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये वतीने करण्यात आले आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हाडाची ठिसुळता (बीएमडी) ही वयाच्या चाळीशीनंतर स्त्री व पुरुष या दोघांमध्ये आढळते. हाडाची ठिसुळता म्हणजे हाडांतील कॅल्शिअम कमी होवून हाडे ठिसुळ व कमकुवत बनतात आणि यामुळे पुढे वरचेवर फ्रॅक्चर व सांधेदुखीचे वयाबरोबर वाढलेले प्रमाण वाढते. स्त्रीयांना रजोनिवृत्तीनंतर वाढत्या वयाबरोबर हाडातील कॅल्शिअमचे प्रमाण ३० ते ४० टक्केपर्यंत कमी झालेले आढळते. हाडाची ठिसुळता याच्याकरिता उपचार पद्धती उपलब्ध आहेत. बाहेर इतरत्र ठिकाणी या तपासणीसाठी १५०० ते २००० रुपये खर्च येणारी ही तपासणी मोफत असून या सुवर्णसंधीचा लाभ घेवून आपल्याला भविष्यात होणार्या हाडांच्या आजारावर मात करण्यासाठी मात करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलकडून करण्यात आले आहे. सदरील शिबिर कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटल, आदर्श नगर,तहसील ऑफीस रोड, बीड येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ७०२०५९०७८८ वर संपर्क करावा.

## आवश्यक असल्यास रोपांची मागणी विहित वेळेत सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा निहाय एकीकृत म्हणून मौजे चिंचोली माळी रोपवाटिका मौजे शरी रोपवाटिका जिल्हा बीड या दोन रोपवाटिकेस तत्वत: मान्यता प्राप्त झालेली आहे. मान्यता दिलेल्या एकीकृत रोपवाटिकेतून जिल्ह्यातील विविध विभागांना सन २०२५ च्या पावसाळ्यात रोपे पुरवठा करण्यात येणार असल्याचे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने जिल्हानिहाय एकीकृत रोपवाटिकेत तयार करण्यात येणारे रोपे निर्मिती बाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बलप्रमुख) म.रा. नागपूर व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा नागपूर यांनी दिनांक १ जानेवारी २०२५ रोजीच्या व्हीसीद्वारे रोपवाटिका निहाय आढावा घेतला असून जिल्ह्यातील विविध विभाग यंत्रणेच्या मागणीनुसार जिल्हा एकीकृत रोपवाटिकेमध्ये रोपे निर्मिती करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार संबधित विभागामार्फत पुढील वर्षी सन २०२५ च्या पावसाळ्याकरिता रोपे लागवडीकरिता आवश्यक असणारी रोपांची मागणी विभागीय वन अधिकारी, समाजिक वनिकरण बीड या कार्यालयास सादर करावी. रोपे निर्मितीचा कालावधी मर्यादित असून विहित कालावधीत रोप निर्मिती न झाल्यास रोपांवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच सन २०२५ च्या पावसाळ्यात वृक्ष लागवड कार्यक्रमासाठी सुदृढ व उंच रोपे उपलब्ध करून देणे जिकीरीचे ठरणार आहे.

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारा राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तींन्ना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान्न करण्यात येतो. क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणा-या जेष्ठ क्रीडा महर्षीकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडामार्गदर्शकांकरिता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक / जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार ( महिला क्रीडा मार्गदर्शक ), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( खेळाडू ), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( साहसी उपक्रम ), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू ) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

शासन निर्णय दि.२९ डिसेंबर २०२३ अन्वये दि.२५ जानेवारी २०२४ नुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडू, सुधारीत नियमावली २०२३ विहित केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३-२४ या वर्षाच्यापुरस्कारासाठी राज्यातील क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू / व्यक्ती यांच्याद्वारा दि.१४ जान्नेवारी ते २६ जान्नेवारी २०२५ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीन्ने अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्ज सादर करणाज्या इच्छुक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम व दिव्यांग खेळाडू यांन्नी विहित मुदतीत क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर स्क्रोलिंग लिंक ( Scrolling Link ) मध्ये उपलब्ध करून्न दिलेल्या लिंकवर दि. १४ जानेवारी ते २६ जान्नेवारी २०२५ या कालावधीत व दि. २६ जानेवारी २०२५ रोजी रात्री १२:०० वाजेपर्यंत फक्त ऑनलाईन्न अर्ज सादर करण्यात यावेत.

## रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी केलं तिळगुळ देऊन विद्यार्थ्यांचे तोंड गोड

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण उत्कृष्ट शाळा व महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमात प्रथम आलेल्या वडगाव शाळेत रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी पुनीता गुरव यांनी आज भेट दिली यावेळी मकर संक्रातीनिमित्तचे औचित्य साधून श्री.संतोष हराळे यांचा वाढदिवस शाळेत विद्यार्थ्यांसोबत साजरा केला सोबतच स्वतः शिक्षणाधिकाऱ्यांनी वडगाव शाळेच्या विद्यार्थ्यांना स्वतःच्या हाताने तिळगुळ भरवून विद्यार्थ्यांचे तोंड गोड करत शाळेचे कौतुक केले,तसेच केंद्रीय संकल्प कार्यकर्मांतर्गत समग्र शिक्षा अभियान २०२४-२५ रायगड जिल्हा परिषद,अलिबाग आयोजित राष्ट्रीय आविष्कार अभियान कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन



करण्यात आले असून दिनांक १५ व १६ जानेवारी रोजी रायगड जिल्हा परिषदेतील निवडक शाळांचे विद्यार्थी नागपूर येथे या अभ्यास सहलीसाठी जाणार आहेत. त्यात वडगाव शाळेतील विद्यार्थ्यांची निवड झालेली असून विद्यार्थ्यांनया टी-शर्ट व फलक तसेच कॅप्र चे वइमोचन व वितरण आज शिक्षणाधिकारी पुनीता गुरव यांच्या हस्ते रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे करण्यात आले यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष सह ग्रामस्थ पालक व विद्यार्थी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

● **विविध उपक्रम राबवून रायगड जिल्ह्यात ठसा उमटविणारे महाराष्ट्राच्या पटलावर रायगड जिल्हा झळकवणारी शाळा म्हणून वडगाव शाळेकडे पाहिले जाते. येथील शिक्षक सुभाष राठोड हे कृतिशील असून आज सकाळी त्यांनी विद्यार्थ्यांना जयुबिलीयंट भरतीया फाउंडेशन कडून खाऊ वाटप केले होते तसेच शाळेतील परसबागेतील भाज्यांचा विद्यार्थी आरोग्यासाठी खूप छान उपयोग होत आहे.**

**म्हणून शाळेचे कौतुक व मुलांना तिळगुळ देऊन शाळेत आजचा दिवस आनंददायीपद्धतीने गेला खूप छान वाटले,शाळेमध्ये सुरू असलेल्या विज्ञान प्रयोगशाळा संगणक प्रयोगशाळा,भाषा प्रयोगशाळेची कामे उत्कृष्ट पद्धतीने सुरू असून शाळेला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. -पुनीता गुरव, शिक्षणाधिकारी प्राथमिक , रायगड**

● **आज मुलांसाठी पर्वणीच म्हणावी लागेल, कारण जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी स्वतः मुलांना तिळगुळ भरवून शुभेच्छा देतात ही असामान्य बाब आहे. नेहमीच आद.मॅडमच्या मार्गदर्शन शाळेला लाभत असते. -सुभाष राठोड, मुख्याध्यापक वडगाव**

## असे करा हरभऱ्यावरील घाटेअळीचे व्यवस्थापन

**बीड । प्रतिनिधी**

सद्यस्थितीत हरभरा हे पिक फुलोरा ते घाटे भरण्याच्या अवस्थेत असून मागील काही दिवसातील ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावरील घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. तसेच अंधाऱ्या रात्रीत घाटेअळीचे पतंग मोठ्या प्रमाणावर अंडी देतात. या सर्व बाबी घाटेअळीस पोषक असल्यामुळे घाटेअळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. बऱ्याच ठिकाणी या अळीने प्रादुर्भाव करण्यास सुरुवात केली आहे. हि कीड बहुभक्षी असून विशेषतः पीक फुलोरा आणि प्रामुख्याने घाटे अवस्थेत नुकसानकारक असते. लहान अळ्या सुरुवातीला कोवळी पाने, व फुले कुरतडुन खातात. घाटे लागल्यानंतर अळ्या घाटे कुरतडुन त्यास छिद्र पाडुन डोके आत खुपसुन आतील दाणे खातात. साधारणतः एक अळी तीस ते चाळीस घाट्यांचे नुकसान करु शकते. सध्या आढळणारी कीड ही अंडी अवस्था व प्रथम अवस्थेतील अळी अवस्था असल्यामुळे वेळीच उपाय योजना केल्यास कमी खर्चात किडींचे प्रभावी नियंत्रण होऊ शकते. या किडीचे खालीलप्रमाणे एकात्मिक व्यवस्थापन करावे. एकात्मिक व्यवस्थापन :- शेतामध्ये इंग्रजी T आकाराचे प्रति एकरी २० पक्षी थांबे लावावेत. घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे लावावेत. सापळ्यामध्ये सतत तीन दिवस ८ ते १० पतंग आढळल्यास किड व्यवस्थापनाचे उपाय योजावेत.

हरभरा पीक फुलोरा अवस्थेत असतांना ५० टक्के निंबोळी अर्काची किंवा ३०० पीपीएम झाडीरेक्टीन ५० मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी. अथवा वातावरणात सापेक्ष आर्द्रता पुरेशी असल्यास व्यूहेरीया बॅसीयांना या जैविक बुरशीनाशकाची ६० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे करावी. त्यामुळे घाटेअळीचे नियंत्रण होऊन तिच्या नैसर्गिक शत्रू कीटकांना अपाय न होता घाटेअळीचे नियंत्रण करण्यास मदत होईल.

घाटेअळीने आर्थिक नुकसान संकेत पातळी गाठल्यास (सरासरी १ ते २ अळी प्रति मीटर ओळीत किंवा ५ टक्के घाट्यांचे नुकसान)शिफारशीत रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा; अन्यथा फवारणी टाळावी. वरील प्रादुर्भाव पातळी गाठल्यानंतर फवारणी केल्यास आपल्या उत्पादनामधील घट टाळून फवारणीचा खर्च भरून निघेल; अन्यथा फवारणीचा खर्च वाया जाऊ शकतो, याची शेतक-यांनी कृपया नोंद घ्यावी.

किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर खालील कोणत्याही एका कीटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून साध्या (नॅपसॅक) पंपाने फवारणी करावी. पावर पंपाने फवारणी करायची असल्यास कीटकनाशकांचे प्रमाण तिप्पट करावे. आवश्यकता भासल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी.

अ.क्र कीटकनाशके मात्रा / १० लि.पाणी क्लोरपायरिफॉस २० ईसी किंवा २० मिली किनालफॉस २५ ईसी किंवा २० मिली इमामेक्टीन बेंझोएट ५ एसजी किंवा ४ ग्रॅम,क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ एससी किंवा २.५ मिली ३९;लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ ईसी किंवा १२ मिली नोव्हाल्युरॉन १० ईसी १५ मिली शेतात किटकनाशकाची फवारणी करतांना हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा व सुरक्षिततेची योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड सुभाष साळवे यांनी केले आहे.

दैनिक मराठवाडा पत्र
मराठवाडा विशेष
बुधवार, दि.१५ जानेवारी २०२५


# समाज संघटित होण्यासाठी सामाजिक अधिवेशनाची आवश्यकता : केंद्रीय ऊर्जामंत्री श्रीपाद नाईक



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

कोणत्याही समाजाच्या सामाजिक संघटनेसाठी सामाजिक अधिवेशनाची आवश्यकता असते अशी भावना देशाचे केंद्रीय नविकरण ऊर्जा मंत्री नामदार श्रीपाद नाईक यानी व्यक्त केली. ते अखिल भारतीय जयस्वाल सर्ववर्गीय महासभेच्या दहाव्या राष्ट्रीय महाधिवेशनात बोलत होते. यावेळी माजी मंत्री प्रकाश चौधरी , संरक्षक प्रदीप जयस्वाल, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल, माजी मंत्री आमदार श्रीमती अनुपमा जायसवाल, राष्ट्रीय महासचिव अटल गुप्ता, राष्ट्रीय कोषाध्यक्ष अजय जायसवाल, राष्ट्रीय युवा अध्यक्ष राजा चौधरी, सुरेंद्रपाल अहलुवालिया चंदीगड, कुमार गौड हैदराबाद, लालचंद गुप्ता प्रमुख अखिल भारतीय कलचुरी स महासभा , श्रीमती अर्चना जायसवाल, श्रीमती सुमन राय महिला अध्यक्ष अ भा कलचुरी स महासभा यांच्यासह देशभरातून विविध गणमान्य पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या महाधिवेशनाची सुरुवात नाविन्यपूर्ण असा उपक्रम महारक्तदान शिबिर घेऊन करण्यात आली. व्यासपीठावर सर्वप्रथम सहस्त्रबाहु भगवान अर्जुन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. त्यानंतर स्वागतगीत श्रीमती उषा रामधामी यांनी गायले. याप्रसंगी महासभेचे मावळते राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल यांनी आगामी काळ सन २०२५- २८ साठी महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून राजकिशोर मोदी यांच्या नावाची घोषणा केली. त्यानंतर केंद्रीय ऊर्जामंत्री नामदार श्रीपाद नाईक यांनी राजकिशोर मोदी यांना राष्ट्रीय अध्यक्ष पदाची तर इतर पदाधिकारी यांना त्यांच्या पदांची शपथ दिली. आपल्या मनोगतात अशोक जायसवाल यांनी आपल्या समाजाला विविध अंगांनी पुढे घेऊन जाणाऱ्या व्यक्तीच्या हाती राष्ट्रीय अध्यक्ष पदाची सूत्रे सोपवताना अतिशय आनंद होत असल्याचे नमूद केले. यावेळी उपस्थित सर्व महासभेने टाळ्यांच्या गजरात राजकिशोर मोदी यांच्या नावाचे स्वागत व अभिनंदन केले. समाजातील मुलांना उच्चशिक्षित करून त्यांना मोठे व्यावसायिक तथा उद्योग क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी प्रेरित करण्याचे आवाहन अशोक जायसवाल यांनी केले. समाजकारण बरोबरच राजकारणात देखील आपल्या पाल्याणा पुढे येऊ देण्याचा प्रयत्न करण्याचे त्यांनी सांगितले. या महाधिवेशनात राष्ट्रीय संरक्षक प्रदीप जयस्वाल, यांच्यासह लालचंद गुप्ता, प्रकाश चौधरी, श्रीमती अर्चना जायसवाल ,अनुपमा जायसवाल यांनी देखील आपले विचार व्यक्त केले. या अधिवेशनाद्वारे समाज एकसंघ होत असल्याबद्दल सर्वांनी आनंद व्यक्त करतांना नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या महाधिवेशनाचे प्रमुख पाहुणे केंद्रीय ऊर्जामंत्री नामदार श्रीपाद नाईक यांनी उपस्थित महासभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी समाज समाज संघटित होण्यासाठी अशा प्रकारच्या सामाजिक अधिवेशनाची आवश्यकता असते असे मत व्यक्त केले. त्यांनी सर्वप्रथम नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. समाज संघटित करणे हे अतिशय अवघड काम आहे. समाजाच्या उन्नतीसाठी समाज संघटन अतिशय महत्वाचे असून हे संघटन राजकिशोर मोदी हे अतिशय उत्तमरीत्या करून सांभाळतील अशी अपेक्षा व्यक्त केली. समाजात आजही अनेक उपेक्षित घटक आहेत त्यांच्या पर्यंत पोचून त्यांना देखिल समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन नामदार श्रीपाद नाईक यांनी नवनिर्वाचित टीमला केले. या कामासाठी आपण देखील सर्वांना वेळोवेळी सहकार्य करू असे आश्वासन नामदार श्रीपाद नाईक यांनी याप्रसंगी दिले.या महाधिवेशनात महाराष्ट्रासह , बिहार ,राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, तेलंगाणा, छत्तीसगड यासह अनेक राज्यातील जायसवाल समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित झाला होता. या अधिवेशनात युवक युवती परिचय मेळावा देखील संपन्न होऊन याद्वारे अनेक युवक युवतीच्या विवाहासाठी अनेक कुटुंब एकत्रित आल्याने हे अधिवेशन सफल झाल्याचे बोलल्या जात होते.

## मुंबई येथे धोंडिबा हातागळे कर्मवीर एकनाथ आवाड समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

**तलवाडा । प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते धोंडीबा हातागळे यांना मुंबई येथे कर्मवीर एकनाथ आवाड समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार कर्मवीर एकनाथ आवाड यांनी देशामध्ये खूप मोठे काम केले आहे. हजारो एकर गायरान जमिनी दिन दलित आदिवासी बहुजन यांच्या नावे करून दिले आहेत. कर्मवीर एकनाथ आवाड यांचे काम सर्व घटकांमध्ये फार मोठ्या प्रमाणामध्ये होते. ते देशातील टॉप दलित नेत्यांच्या यादीमध्ये होते. एकनाथ आव्हाड यांनी हजारो कार्यकर्ते गावागावांमध्ये तयार केलेले आहेत आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करत आहेत अशाच कार्यकर्त्यांना या पुरस्काराचा मानकरी म्हणून कर्मवीर एकनाथ आवाड समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. मानवी हक्क अभियानाचे तालुका अध्यक्ष धोंडीबा हातागळे यांचे काम याच पातळीवर तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये दिसून येते.याच त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना कर्मवीर एकनाथ आवाड समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. धोंडीबा हातागळे यांचे काम तालुक्यामध्ये दलित ,वंचित, आदिवासी ऊसतोड कामगार, विद्यार्थी, निराधार आणि इतर घटकांमध्ये खूप मोठ्या प्रमाणामध्ये दिसून येते म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

## महत्वाच्या सण उत्सवासाठी वाद्य वाजविण्याचे दिवस व वेळ निश्चित

**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरण विभागांचे शासन निर्णयानुसार उत्सव कालावधीत १५ दिवस सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी ध्वनी प्राधिकरण तथा जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याशी सल्ला मसलत करून दिवस निश्चित करण्याबाबत सूचना केल्यो होत्या आणि जिल्ह्यात दोन्ही प्रदूषण नियंत्रण प्राधिकरण यांचे कार्यालय नसल्याने पोलीस अधीक्षक बीड यांना खालील नमूद केलेल्या दिवशी वाद्य वाजविण्यासाठी परवानगी देण्यास अभिप्राय मागवले असता त्यांनी अनुकूल अभिप्राय सादर केला आहे.

अटी व शर्तीस अधिन राहून खालील प्रमाणे नमूद केलेल्या दिवशी १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधी दरम्यान सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीची मर्यादा राखून वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यात आली आहे. सण व उत्सवाचे नाव पुढील प्रमाणे: शिवजयंती १दिवस, ईद-ए-मिलाद १ दिवस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १दिवस १ मे महाराष्ट्र दिन १, दिवस गणपती उत्सव ४ दिवस अनंत चतुर्दशी सह शेवटचे ३ दिवस, नवरात्री उत्सव २ दिवस अष्टमी व नवमी दिवाळी एक दिवस लक्ष्मीपूजन ख्रिसमस एक दिवस ३१ डिसेंबर एक दिवस उर्वरित २ दिवस महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी राखीव

## शिरूर तालुक्यातील महिलांनी केली मकर संक्रांति साजरी

**शिरूर । प्रतिनिधी**



महिलांच्या आवडता सण म्हणजे मकर संक्रात या दिवशी सर्व महिला स्थानिक देव देवीताना अनवाणी सामूहिक पणे दर्शनाचा लाभ घेत असतात प्रामुख्याने महिला दिवसभर उपवास करून आपल्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी देवाकडे प्रार्थना करत असतात या दिवशी एकमेकींना हळदी कुंकू लावणे तिळगुळ देऊन गोड गोड बोला एक दिवस भोगी व दुसऱ्या दिवशी मकरसंक्रात असे क्रम असून यानंतर जवळपास १५ ते २० दिवस एकमेकींच्या घरी जाऊन मकर संक्रात एकमेकांना भेटवस्तू हळदीकुंकू देऊन साजरी करण्यात येते मंगळवार (दि.१४) पासून या पुढील पंधरा दिवस हा महिलांचा दिनक्रम दररोज पहावयास मिळत असतो या दिवशी सर्व महिला मोठ्या प्रमाणावर आनंद उत्सवाने हा सण हसतमुखाने साजरा करत असतात. शहरातील महिला ग्रामदैवत कालिका देवी, गणपती मंदिर, मारुती मंदिर, विठ्ठल रखुमाई मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, स्वामी समर्थ मंदिर, दत्त मंदिर आदी ठिकाणी ववसण्याची वेळ सकाळी ९ ,ते ५ वाजेपर्यंत कार्यक्रम महिलानी केला आहे.

## ऑनलाईन मार्केटिंगच्या युगात महिला बचत गटांनी दर्जेदार वस्तूंचे उत्पादन करावे : मुख्याधिकारी तथा प्रशासक श्रीमती अर्पिता ठुबे (भा.प्र.से.)

### अंबाजोगाई नगरपरिषदेकडून बचत गटातील महिलांसाठी मार्गदर्शन शिबिर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**





ऑनलाईन मार्केटिंगच्या युगात टिकेल अशा दर्जेदार वस्तूंचे उत्पादन महिला बचत गटांनी करावे असे आवाहन मुख्याधिकारी तथा प्रशासक श्रीमती अर्पिता ठुबे (भा.प्र.से.) यांनी केले. त्या अंबाजोगाई नगरपरिषदेच्या वतीने आयोजित बचत गटातील महिलांना विविध योजनांचे मार्गदर्शन शिबिरात बोलत होत्या. नगरपरिषद अंबाजोगाई यांच्या वतीने सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बचत गटातील महिलांना विविध योजनांचे मार्गदर्शन शिबिर हे दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान नगर परिषद अंबाजोगाई व शहर उपजिविका केंद्र (सीएलसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. शहरातील बचत गटातील महिलांना विविध योजनांची माहिती होण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन शिबिर अतिशय उपयुक्त ठरले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक श्रीमती अर्पिता ठुबे (भा.प्र.से.) या होत्या. याप्रसंगी स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे, डीएवाय - एनयुएलएम विभागाचे शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे आणि समीर शेख हे उपस्थित होते. या प्रसंगी अध्यक्षीय भाषणातून उपस्थित महिला बचत गटांच्या कार्यकर्त्या, सभासद यांच्याशी संवाद साधताना श्रीमती अर्पित ठुबे यांनी सांगितले की, महिला बचत गटांनी उत्पादित वस्तू, पदार्थ, साहित्य इत्यादी बाबींचे मार्केटिंग, उत्तमरित्या केले पाहिजे, सध्याचे युग हे ऑनलाईन मार्केटिंगचं आहे, त्यामध्ये सुद्धा आपण महिलांनी विविध प्रकारचे लायसन्स नोंदणी करून तसेच उत्पादित वस्तू दर्जेदार व वस्तूंचे डिझाईनिंग, पॅकेजिंग आकर्षक, उत्कृष्ट कसे राहील याचे प्रॉपर ट्रेनिंग घेऊन आधुनिक स्पर्धेच्या युगामध्ये टिकेल यासाठी पुढे आले पाहिजे.

उपस्थित महिलांना त्यांनी विविध स्वरूपाची उदाहरणे देऊन उद्योग व्यवसाय करणेसाठी पुढे आले पाहिजे असे त्या म्हणाल्या.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात नामविस्तार दिन साजरा

### नामविस्तार म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा जपणे होय : प्रा बोडके

**माजलगाव । प्रतिनिधी**



म.शि.प्रसारक मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. के. सानप होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून इतिहास विभाग प्रमुख प्रा. बालाजी बोडके होते. यावेळी उपप्राचार्य डॉ.एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य डॉ. उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे,डॉ भाऊसाहेब राठोड, प्रा.सुदर्शन स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी बोलताना प्रा. बालाजी बोडके म्हणाले की, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विद्यापीठाला मिळणे हे आपले भाग्य आहे. नामविस्तार आणि ज्ञानविस्तार होणे म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचारांचा वारसा जपणे होय. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिल्यामुळे विद्यापीठाचे भुषण वाढले आहे. यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ .एस. एन. इप्पर यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. अरुण पेंटावार यांनी केले तर आभार प्रा. उमेश राठोड यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी - विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## शाळेसाठी भंगार एसटी महामंडळाच्या बस रस्त्यावर; विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ ?

**नेकनुर । प्रतिनिधी**

परिवहन विभागाच्या काही बस या भंगार अवस्थेत निघाल्या आहेत. यामुळे चालकाच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. शिवाय भंगारात जाण्याऱ्या बस रस्त्यावर धावत असल्यानं प्रवाशांच्या आणि विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका असतो. आज बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी ने - आण करणारी बस भंगार अवस्थेत असणारी बस आहे. शिवाय भंगारात जाण्याऱ्या बस रस्त्यावर धावत असल्यानं प्रवाशांच्या जीवाला धोका असतो. परिवहन विभाग याला गांभीर्याने घेताना दिसून येत नाही. भंगार, नादुरुस्त बस रस्त्यावर

एसटी महामंडळाच्या भंगार बसेसचा मुद्दा सातत्याने ऐरणीवर येत आहे. एसटी महामंडळाच्या भंगार आणि नादुरुस्त बसेसमुळे अनेक ठिकाणी अपघातांच्या घटना घडत आहेत. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सोडली जाणारी बस भंगार अवस्थेतलीच बस आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी दररोज भंगार मधली बसच पाठवली जाते. या बस मधून विद्यार्थ्यांना जीवघेणा प्रवास सुद्धा करावा लागतो. कधी खिडकी नाही तर कधी त्या बसच्या खिडकीला काचे सुद्धा नाहीत. यामुळे लहान विद्यार्थी खिडकीम



धून डोकावत सुद्धा असतात. परंतु आज शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सोडल्या जाणारे बसचे वरील छतच उडून गेले आहे. यामुळे आता विद्यार्थी शाळेत वेळेवर पोहोचणार नाहीत. शाळेच्या होणाऱ्या नुकसानीस परिवहन मंडळ जबाबदार राहणार का यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून शाळेसाठी कधी बस येते तर कधी नाही यासाठी अनेक वेळा संबंधित तिडके अधिकारी असणारे यांना शाळेचे मुख्याध्यापक जगताप सर यांनी तक्रार केली असता त्यांनी या तक्रारीला केराची टोपली दाखवल्याचे सुद्धा शाळेचे मुख्याध्यापक यांनी बोलताना म्हटले आहे. सतत शाळेसाठी भंगार बस आणि नादुरुस्त बसच पाठवली जाते. जर एखाद्या वेळेस शाळेसाठी येणारी बस ना दुरुस्त असेल भंगार असेल आणि या बसमधून विद्यार्थी जर प्रवास करत असतील तर दुर्घटना घडलीच तर परिवहन महामंडळ जबाबदार राहणार का ? विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानास कोण जबाबदार राहणार ? तिडके अधिकारी नेमक ऐकते कोणाचे ? शाळेसाठी असल्या नादुरुस्त बस पाठवल्या तर विद्यार्थ्यांना या बस मधून जीव घेणा प्रवास करावा लागत आहे. एसटी महामंडळ अशा भंगार बसेस रस्त्यावर चालवून प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत आहे का ?, असा संतप्त सवाल आता पुन्हा एकदा विचारल्या जाऊ लागला आहे. अशा बसेसमुळे प्रवाशांना आणि विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. भंगार बस रस्त्यावरून धावतात. त्यावर निर्बंध लावणे आवश्यक आहे.

## तलवाडा गावच्या वेसीचे नाक दुरुस्त होईल का ?

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामपंचायत सर्वात मोठी आहे ती ताब्यात मिळावा म्हणून माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांनी माजी जिल्हा सदस्य सुरेश हात्ते यांच्याविरुद्ध मध्ये पॅनल उभा करून ग्रामपंचायत माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी विजय मिळवला आहे त्यानंतर ग्रामपंचायतचे सरपंच विष्णू तात्या यांच्याकडे पद आले सरपंच पद येत असताना विकासाच्या माध्यमातून तलवाडा गावांमध्ये अनेक काम हात्ते आणि त्या ठिकाणी केले आहे काम करीत असताना जो मुख्य गावचा आरसा तो अनेक दिवसापासून ना दुरुस्त आहे ते म्हणजे वेसीच नाक आहे कारण की त्या वेसीची आठवण शेतकऱ्यांचा मोठा सण म्हणजे बैलपोळा बैलपोळ्याच्या निमित्ताने वेशी मधून जेव्हा बैलाची मिरवणूक निघते तेव्हा त्या वेसीची आठवण होते हे वेशीचं नाक आत्तापर्यंत दुरुस्त झालेले नाही किंवा डागडुजी सुद्धा वेस करण्यात आली नाही म्हणून गावकरी माजी आमदार अमरसिंह पंडित व सरपंच यांच्याकडे विनंती करतात की तलवाडा गावचं वेशीचं नाक दुरुस्त करून द्यावे.

